ePaper

**व्हेनेझुएलावर आता अमेरिकेची सत्ता, डोनाल्ड ट्रम्प यांची मोठी घोषणा!**

| वर्ष - 9 | अंक -131 | UDYAM-MH-26-0158827 |



महाईन्यूज ™

## आतील पानांत


- खेळात राजकारण आणणे योग्य नाही
- स्टब्स आणि रिकेल्टनला दिला डच्चू!
- ममता बॅनर्जींच्या सत्तेला सुरूंग?
- दिल्लीत श्वास घेणे मृत्यूला आमंत्रण


www.mahaenews.com | रविवार, दि. 4 जानेवारी 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

### मुंबईतील पहिल्याच प्रचारसभेत एकनाथ शिंदेंचा उद्धव ठाकरेंवर घणाघात

# कार्यसम्राट नाही, तर करप्शन सम्राट!

## वरळीत महायुतीची पहिली जाहीर सभा; 'भावनेचं राजकारण संपलं

| मुंबई |
प्रतिनिधी | महाईन्यूज

**आगामी मुंबई महानगरपालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर मुंबईतील प्रचारसभा रंगात येऊ लागल्या असून, आज वरळी येथे झालेल्या महायुतीच्या पहिल्या जाहीर सभेत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांच्यावर शब्दांचे तीव्र प्रहार केले. "कार्यसम्राट नाही, तर करप्शन सम्राट" अशा बोचऱ्या शब्दांत शिंदेंनी ठाकरेंच्या 'करून दाखवलं' या घोषणेचा समाचार घेतला. भावनिक राजकारणाला आता मुंबईकर बळी पडणार नाहीत, विकास हाच एकमेव मुद्दा आहे, असा ठाम संदेश देत शिंदेंनी संपूर्ण भाषणात आक्रमक भूमिका घेतली.**

सभा सुरू होताच शिंदेंनी मुंबई आणि महाराष्ट्राच्या अस्मितेवर ठाम भूमिका मांडली. "कोणी माईचा लाल आला, कोणी सात पिढ्या खाली आला तरी मुंबई महाराष्ट्रापासून वेगळी होऊ शकत नाही," असे ठणकावून सांगत त्यांनी मुंबई वेगळी करण्याच्या कथित राजकारणावर जोरदार टीका केली. "आता भावनेचं राजकारण संपलंय. मुंबईकरांना विकासाचे मारेकरी नकोत, विकासाचे वारकरी हवेत," असे म्हणत त्यांनी ठाकरे गटावर थेट निशाणा साधला.



- मुंबईकरांना विकासाचे वारकरी हवेत' असा ठाम संदेश
- मुंबई महाराष्ट्रापासून वेगळी होऊ शकत नाही
- करप्शन फर्स्ट विरुद्ध मुंबई फर्स्ट, शिंदेंचा जोरदार हल्लाबोल

### भावनेऐवजी विकासाचा हिशोब मागितला

"निवडणुका जिंकायच्या असतील तर भावना नाही, तर विकास करून दाखवावा लागतो," असे सांगत शिंदेंनी गेल्या अनेक वर्षांत मुंबईत सत्तेत असलेल्या नेतृत्वाला प्रश्न विचारले. "इतकी वर्षे सत्ता असूनही मराठी माणूस मुंबईबाहेर वसई-विरार, नालासोपारा, अंबरनाथ, बदलापूरकडे का ढकलला गेला? याचं उत्तर कोण देणार?" असा सवाल त्यांनी उपस्थित केला. मुंबईकर जनता आता सुज्ञ झाली असून, केवळ जाहिराती आणि घोषणांवर विश्वास ठेवणार नाही, असा दावाही त्यांनी केला.

प्रकल्पांवर प्रश्नांची सरबत्ती भाषणाच्या पुढील टप्प्यात शिंदेंनी मुंबईतील विविध प्रकल्पांबाबत प्रश्नांची सरबत्ती केली. "मुंबईच्या मेट्रो प्रकल्पात खोडा कोणी घातला? मुंबईची लाईफलाईन असलेल्या बेस्टचं वाटोळं कोणी केलं? कोविड काळात रुग्णांच्या तोंडातली खिचडी कोणी खाल्ली? बॉडी बॅगमध्ये पैसे बनवण्याचं पाप कोणी केलं?" असे अनेक प्रश्न त्यांनी उपस्थित केले. मिठी नदीच्या गाळापासून ते पत्रा चाळ, बीडीडी चाळ, गिरणी कामगारांच्या घरांपर्यंत अनेक मुद्द्यांवर शिंदेंनी ठाकरे गटावर थेट आरोप केले. "गरीब मुंबईकरांच्या घराचं स्वप्न धुळीला कोणी मिळवलं? मोक्याचे भूखंड धनदांडग्यांच्या घशात कोणी घातले? गिरणी कामगारांच्या तोंडाला पानं कोणी पुसली?" असे प्रश्न विचारत शिंदेंनी सभेतील वातावरण अधिकच तापवलं.

### निवडणुकीत आक्रमक राजकारणाचे संकेत

वरळीतील या पहिल्याच प्रचारसभेतून महायुतीने आक्रमक प्रचाराची दिशा स्पष्ट केली आहे. मुंबईतील विकास, भ्रष्टाचाराचे आरोप, मराठी माणसाचा प्रश्न आणि रखडलेले प्रकल्प हे मुद्दे केंद्रस्थानी ठेवून शिंदेंनी ठाकरे गटावर थेट हल्लाबोल केला. आगामी काळात मुंबईच्या राजकारणात आरोप-प्रत्यारोपांची धार आणखी तीव्र होणार असल्याचे संकेत या सभेतून मिळाले आहेत. महानगरपालिकेच्या निवडणुकीत मुंबईकर कोणाच्या बाजूने कौल देतात, हे येणाऱ्या काळात स्पष्ट होईल

### 'करून दाखवलं' की 'करप्शन करून दाखवलं'?

ठाकरे गटाच्या 'करून दाखवलं' या जाहिरातीवर टीका करताना शिंदेंनी अत्यंत तीव्र शब्द वापरले.

"कचऱ्यात करप्शन करून दाखवलं, गटारात करप्शन करून दाखवलं, डांबरात करप्शन करून दाखवलं, खिचडीत करप्शन करून दाखवलं, मिठी नदीच्या गाळात करप्शन करून दाखवलं," असा आरोप करत त्यांनी ठाकरेंना 'करप्शन सम्राट' अशी उपमा दिली. "हे कार्यसम्राट आहेत का? मी म्हणेन हे करप्शन सम्राट आहेत. किती खाणार?" असा सवाल करत शिंदेंनी सभागृहात टाळ्यांचा कडकडाट मिळवला.

### "त्यांची भूमिका करप्शन फर्स्ट, आमची भूमिका मुंबई फर्स्ट,"

असा स्पष्ट फरक दाखवत शिंदेंनी महायुतीचं ध्येय 'मिशन महाराष्ट्र फास्ट आणि मुंबई सुपरफास्ट' असल्याचं सांगितलं. "खूप वर्ष मुंबई लुटून खाल्ली, आता बनवाबनवी चालणार नाही. मुंबईकर आता फसणार नाही," असा इशाराही त्यांनी दिला.

### मराठी कंत्राटदारांचा मुद्दा

मराठी माणसाच्या मुद्द्यावर बोलताना शिंदेंनी थेट प्रश्न विचारला, "महापालिकेची कंत्राटं देताना मराठी कंत्राटदार कधी दिसले का?" मराठी कंत्राटदारांना ब्लॅकलिस्ट करण्याचं पाप कोणाचं, असा सवाल करत त्यांनी 'जिथे टेंडर तिथे सरेंडर' ही भूमिका ठाकरे गटाची असल्याचा आरोप केला. "किचन कॅबिनेटमधला चंपकलाल कोण आहे?" असा टोला लगावत पत्रकारांना शोधपत्रकारिता करण्याचं आवाहन केलं.

अजित पवार यांना सुनावलं

## आम्हाला दमात अन् हलक्यात घेऊ नका

# महायुतीत वादाची ठिणगी?

। पुणे।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**राज्यातील २९ महापालिकांच्या निवडणुकीच्या प्रचाराची रणधुमाळी सुरू आहे. या प्रचाराच्या निमित्ताने महायुतीच्या नेत्यांमध्येच वादाची ठिणगी पडल्याचं चित्र दिसून येत आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी भाजपावर बोलताना 'पिंपरी चिंचवड महापालिकेत भाजपाची सत्ता आल्यानंतर भ्रष्टाचाराचा कळस गाठला गेला. स्थानिक नेत्यांची राक्षसी भूक दिसून आली' अशी टीका केली होती. त्यांच्या या टिकेनंतर आता भाजपाच्या नेत्यांकडून अजित पवारांना इशारा देण्यात येत आहे.**

## चंद्रकांत पाटलांचा पवारांना इशारा



अजित पवारांना सोबत घेतल्याचा पश्चाताप असल्याचं मोठं वक्तव्य रविंद्र चव्हाण यांनी केलं. त्यानंतर आता भाजपाचे नेते चंद्रकांत पाटील यांनी एका कार्यक्रमात बोलताना अजित पवारांना अप्रत्यक्ष इशारा दिला आहे. 'आम्हाला दमात आणि हलक्यात घेऊ नका. मुख्यमंत्री आणि गृहमंत्री देखील आमच्याकडेच आहे', असं म्हणत चंद्रकांत पाटील यांनी अजित पवार यांना सुनावलं आहे."मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आमच्यासमोर निवडणुकीचं एक धोरणं मांडलं. ही निवडणूक आपल्याला विकासावर न्यायची आहे. महायुतीमधील नेत्यांनी एकमेकांवर अजिबात टीका करायची नाही. मात्र, टीका करायला सुरुवात झाली. ही टीका किती चालणार? कुठे थांबणार? याचा अंदाज घेऊ. मागच्या नगरपरिषदांच्या निवडणुकीत टीका करणाऱ्यांनी म्हटलं होतं की तिजोरीची चावी आमच्याकडे आहे, त्यानंतर मी भोरमधील एका सभेत म्हटलं होतं की तिजोरीची चावी तुमच्याकडे आहे, पण तिजोरीचा मालक आमच्याकडे आहे", असं म्हणत चंद्रकांत पाटील यांनी अजित पवार यांच्यावर अप्रत्यक्ष टीका केली."मी आता असं म्हणेन की, 'ये घरला जायचयं का?' असं म्हणणाऱ्यांना मी सांगतो की, मुख्यमंत्री पण आमच्याकडे आहेत आणि गृहमंत्री पण आमच्याकडेच आहेत. त्यामुळे दमात घेऊ नका आणि हलक्यात पण घेऊ नका", असा अप्रत्यक्ष इशारा चंद्रकांत पाटील यांनी अजित पवार यांना दिला आहे.महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पिंपरी-चिंचवड येथे बोलताना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी भाजपावर आरोप केले होते. त्या आरोपांना चव्हाण यांनी प्रत्युत्तर दिलं. यावेळी रवींद्र चव्हाण म्हणाले की, 'अजित पवार यांनी पहिल्यांदा स्वत:च्या पक्षाकडे पाहिलं पाहिजे. 'खुदके गिरेबान में झांकना चाहिये' अशी एक म्हण हिंदीत आहे. आम्ही आरोप केले तर अजित पवारांच्या अडचणी वाढतील,' अशा शब्दांत भाजपा प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी अजित पवार यांना शनिवारी इशारा दिला.'पंतप्रधान मोदी आणि मुख्यमंत्री फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील पक्षाबद्दल आपण बोलत आहोत, हे त्यांनी ध्यानात ठेवावं.'उपमुख्यमंत्री अजित पवार हे भाजपासोबत कशापद्धतीने जोडले गेले, हे सर्वांना माहिती आहे. त्यांना सोबत घेण्याबाबत पुणे, पिंपरी-चिंचवडमधील पक्षाचे पदाधिकारी मला थोडा विचार करा म्हणून सांगत होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनाही मी नेहमी खासगीत सांगायचो की थोडा विचार करावा. पण आता पवार यांना सोबत घेत असल्याचा पश्चाताप होत आहे', पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणुकीतील भाजपा उमेदवारांच्या प्रचाराच्या शुभारंभाच्या निगडीतील कार्यक्रमात चव्हाण बोलत होते.

### पवारांच्या अडचणी वाढतील

अजित पवारांना सोबत घेतल्याचा पश्चाताप असल्याचं मोठं वक्तव्य रविंद्र चव्हाण यांनी केलं. त्यानंतर आता भाजपाचे नेते चंद्रकांत पाटील यांनी एका कार्यक्रमात बोलताना अजित पवारांना अप्रत्यक्ष इशारा दिला आहे. 'आम्हाला दमात आणि हलक्यात घेऊ नका. मुख्यमंत्री आणि गृहमंत्री देखील आमच्याकडेच आहे', असं म्हणत चंद्रकांत पाटील यांनी अजित पवार यांना सुनावलं आहे.

# भाजपाचे 'कारभारी त्रिकूट' बदला

## अजित पवार यांचे पुणेकरांना आवाहन ;प्रगतीचा आलेख ढासळला

। पुणे ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**'महापालिकेची सत्ता ज्यांच्याकडे होती. त्यांनी गेल्या सात वर्षात शहर विकासासाठी कोणतेही ठोस काम केले नाही. काही वर्षापूर्वी ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी पुण्याचे कारभारी बदला, असे आवाहन केले होते. त्याला प्रतिसाद देत पुणेकरांनी तत्कालीन राष्ट्रवादी काँग्रेसच्या हाती सत्ता दिली.**



आता महापालिकेतील 'कारभारी त्रिकूट' बदलण्याची वेळ आली आहे,' अशा शब्दात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी भाजपच्या कारभारावर टीका करताना पुणेकरांना सत्ता देण्याची साद घातली. राष्ट्रवादी काँग्रेस भवन येथे आयोजित पत्रकार परिषदेत अजित पवार यांनी महापालिकेतील सत्ताधाऱ्यांच्या कारभाराचा लेखाजोखा शुक्रवारी पत्रकार परिषदेत मांडला. 'कारभारी त्रिकूट' बदलण्याचे आवाहन करताना अजित पवार यांनी संबंधित 'त्रिकूटा'चे नाव घेणे टाळले. मात्र, 'सत्तेची सूत्रे ज्यांच्याकडे होती त्यांच्याबाबत बोलत आहे' अशी टीप्पणी त्यांनी केली.दरम्यान, २०१७ मध्ये महापालिकेच्या इतिहासात पहिल्यांदाच भाजपला एकहाती सत्ता मिळाली. त्यानंतर विद्यमान केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्याकडे प्रथम स्थायी समिती अध्यक्षपदाची आणि त्यानंतर महापौर पदाची जबाबदारी होती. कसब्याचे विद्यमान आमदार हेमंत रासने यांना शेवटची सलग तीन वर्षे स्थायी समिती अध्यक्षपद मिळाले होते. 'स्वीकृत नगरसेवक' असलेले गणेश बीडकर यांना शेवटच्या टप्प्यात सभागृहनेते पदाची जबाबदारी देण्यात आली. तसेच श्रीनाथ भिमाले आणि धीरज घाटे यांना अल्पकाळ सभागृह नेते होतेपाणीपुरवठा, वाहतूक कोंडी, सांडपाणी शुद्धीकरण प्रकल्प, घनकचरा व्यवस्थापन अशा सर्वच क्षेत्रात महापालिकेची कामगिरी निष्क्रिय ठरली आहे.

### सत्ता देण्याचे आवाहन

शहराची"सांस्कृतिक शहर' ही ओळखही पुसण्याचे काम केले जात आहे. सत्ताधाऱ्यांच्या नाकर्तेपणामुळे शहराच्या प्रगतीचा आलेख ढासळत आहे. 'सुबक, सुंदर आणि सुविधायुक्त' शहर करण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसच्या हाती सत्ता द्या.''मागील सत्ताधाऱ्यांनी ७३ हजार कोटी रुपयांचा खर्च केला. मात्र, नागरी सुविधा देण्यात त्यांना अपयश आले आहे. विकास आराखडा, प्रादेशिक विकास योजनेतील रस्ते रखडले आहेत. खड्डे दुरुस्तीवरच केवळ खर्च होत आहे. सत्ताधाऱ्यांच्या नाकर्तेपणामुळे पाण्यासाठी वणवण फिरावे लागत आहे. सांडपाणी शुद्धीकरण प्रकल्पांची क्षमता अपुरी आहे.

भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांचा इशारा

देवा शप्पथ सांगतो;

# पैलवानाच्या नादाला लागयचं नसतं!

## उपमुख्यमंत्री अजित पवार 'स्क्रीप्ट'वर बोलू नका!

।पिंपरी चिंचवड।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवडमध्ये त्यांनी पत्रकार परिषद घेतली आणि स्क्रिप्ट'च्या आधारे एजन्सीच्या सल्ल्याने बिनबुडाचे आरोप केले. त्यांच्या काळात शहरात काय झाले आणि भाजपाच्या सत्ताकाळात काय विकासकामे केली हे आम्ही सांगतो. पण, "देवा शप्पथ सांगतो; पैलवानाच्या नादाला लागू नका.." असा इशारा भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे नाव न घेता दिला आहे.**



पिंपरी-चिंचवड महानगरपालिका निवडणूक-2026 च्या निमित्ताने भारतीय जनता पार्टीने निगडी येथील भक्ती-शक्ती शिल्पाजवळ आयोजित कार्यक्रमात निवडणुकीच्या प्रचाराचा शुभारंभ केला. यावेळी चव्हाण बोलत होते. या प्रसंगी शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे, महामंत्री राजेश पांडे, आमदार शंकर जगताप, आमदार अमित गोरखे, आमदार उमा खापरे यांच्यासह शहरातील पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी भोसरी विधानसभेतील भरत लांडगे, शिवसेना उबाठा पिंपरी-चिंचवड शहर संघटक संतोष वाळके, उपविभाग प्रमुख अविनाश लोणारे, भाऊसाहेब काटे, भोसरी विधानसभा समन्वयक साईनाथ ढाकणे, मनोज परांडे, राजकुमार बांगर, शाखाप्रमुख प्रिमशिल पोटभरे, सचिन नायकुडे, सुभाष खेडकर, नवनाथ परांडे, पंडित वाळके, बापुशेठ परांडे, नितीन परांडे, पप्पु तुपे, चेतन कदम, संकेत परांडे, शुभम वाळके, ऋत्विक कदम, अमित सोरटे, सुदर्शन कदम, अजय काळे, प्रदीप परांडे, किरणशेठ वाळके, अजय परांडे, निलेश वाळके यांच्यासह राष्ट्रवादीचे अनवर शेख, गणेश सानप, संतोष फुंदे, रविंद्र राख, सरचिटणीस अजहर खान, सामाजिक न्याय विभागाचे अध्यक्ष गंगाताई धेंडे, कायदा सेलचे ॲड. विशाल जाधव, ग्राहक संरक्षण समितीचे अध्यक्ष गणेश सस्ते, गणेश यादव, महिला आघाडीच्या शुभांगी जाधव आदींनी भारतीय जनता पार्टीत प्रवेश केला आहे.

> भारतीय जनता पार्टीची विचारधारा 'राष्ट्र प्रथम' म्हणून काम करीत आहे. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर लोकांची दिशाभूल करणाऱ्यांना पिंपरी-चिंचवडकर भुलणार नाहीत. वर्षानुवर्षे त्यांनी केलेला कारभार पिंपरी-चिंचवडकरांनी पाहिला आहे. शहर स्मार्ट करण्यासाठी, मेट्रो सिटी घडवण्यासाठी वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी इन्फ्रास्ट्रक्चर उभा केले पाहिजे. महाविकास आघाडीच्या सत्ताकाळात याचा विचार केला नाही आणि आज वर तोंड करुन बोलत आहेत. हिंदुत्वाचे नाव घ्ययला घबारताहेत. हिंदुत्वाचे नाव घ्यायला अंगात रग लागते. ती भाजपाशिवाय कोणाकडेही नाही.
>
> **–रविंद्र चव्हाण, प्रदेशाध्यक्ष, भाजपा.**

रविंद्र चव्हाण म्हणाले की, भाजपाचा कार्यकर्ता कायम लोकांच्या सेवेत आहे. सेवेतून संघटन आम्ही पुढे नेत आहोत. केंद्र व राज्य सरकारने सातत्याने लोकहिताचे निर्णय घेतले आहेत. त्यामुळे मोदी सरकार, फडणवीस सरकारला लोकप्रियता मिळाली आहे. लोकसभा निवडणुकीत ज्याप्रमाणे खोटा नॅरेटिव्ह केला. तसा आता काहीलोक महापालिका निवडणुकीत करण्याचा प्रयत्न करीत आहेत. काही लोकांना एजन्सीज् स्क्रिप्ट लिहून देतात. एजन्सीज भाड्याने घ्यायच्या आणि पैसा जक्कड आहे. त्यामुळे हजार-दोन हजार लोकांना कंपन्यांमध्ये बसवून ट्रोल करायला पैसे द्यायचे. मी किती पॉप्युलर आहे, हे दाखवण्यासाठी काहीपण करायला लोक तयार आहेत, असा घणाघातही चव्हाण यांनी केला .

## राष्ट्रवादी शरद पवार पक्षाला "आरपीआय डेमोक्रॅटिक"चा पाठिंबा

### शहराध्यक्ष तुषार कामठे यांनी भूमिकेचे केले स्वागत

।पिंपरी चिंचवड।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड व पुणे महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (डेमोक्रॅटिक) यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरद पवार गट) यांना अधिकृत पाठिंबा जाहीर केला आहे. याबाबतचे लेखी निवेदन आरपीआय (डेमोक्रॅटिक) पिंपरी-चिंचवड शहराध्यक्ष विनोद अशोक विधाटे यांनी राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष तुषार कामठे यांना दिले.**





शहरातील सामाजिक समता, संविधानिक मूल्ये, दलित, वंचित, ओबीसी, महिला व युवकांचे प्रश्न प्रभावीपणे मांडण्यासाठी व्यापक लोकशाही आघाडीची आवश्यकता असल्याचे या निवेदनात नमूद करण्यात आले आहे. आरपीआय (डेमोक्रॅटिक) व राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) यांच्यात वैचारिक समन्वय असून सर्वसामान्य नागरिकांचे प्रश्न सोडवण्यासाठी ही युती उपयुक्त ठरेल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.

या पाठिंब्यामुळे महापालिका निवडणुकीत मतांचे विभाजन टळेल, लोकशाही मूल्ये अधिक बळकट होतील आणि शहराच्या विकासाला चालना मिळेल, असेही निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे. पुढील टप्प्यात जागावाटप, संयुक्त प्रचार व समन्वय समिती स्थापन करण्याबाबत चर्चा करण्याची तयारी आरपीआय (डेमोक्रॅटिक) ने दर्शवली आहे. दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष तुषार कामठे यांनी आरपीआय (डेमोक्रॅटिक) च्या या भूमिकेचे स्वागत करत ही आघाडी शहराच्या राजकारणात सकारात्मक बदल घडवेल, असा विश्वास व्यक्त केला. या वेळी आरपीआय (डेमोक्रॅटिक) चे उपाध्यक्ष सिद्धार्थ अशोक गायकवाड, युवक अध्यक्ष शंकर शिवाजी माने, ओबीसी सेल अध्यक्ष विजय महाजन, महिला आघाडी शहराध्यक्ष अश्विनी कदम व उपाध्यक्ष सारिका कापसे यांची उपस्थिती होती.

> "रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (डेमोक्रॅटिक) यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरद पवार गट) ला दिलेला पाठिंबा हा सामाजिक न्याय, समता आणि लोकशाही मूल्ये बळकट करणारा आहे. शहरातील दलित, वंचित, ओबीसी, महिला व युवकांच्या प्रश्नांवर एकत्रितपणे लढा देण्यासाठी ही व्यापक लोकशाही आघाडी महत्त्वाची ठरेल. सर्व समविचारी शक्तींना सोबत घेऊन पिंपरी-चिंचवडच्या सर्वांगीण विकासासाठी आम्ही सकारात्मक व ठोस निर्णय घेऊ,"
>
> **—तुषार कामठे,** शहराध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरद पवार गट), पिंपरी-चिंचवड.

# कर्जगाळात रुतला बांगला देश



## भूमिका

**रताचा शेजारी देश असणाऱ्या बांगला देशात सरकार स्थापनेसाठी आणि पंतप्रधान निवडीसाठी सार्वत्रिक निवडणुकीची घोषणा कधीही होऊ शकते. निवडणूक आयोगाने तेथील संसदेमधील ३०० जागांवर मतदानासाठी आवश्यक तयारी पूर्ण केली आहे.**

शेख हसीना सत्तेपासून दर गेल्यानंतर देशातील राजकीय समीकरणे पूर्णपणे बदलली आहेत. दीर्घकाळ एका शक्तिशाली नेतृत्वाच्या छायेखाली राहिलेल्या बांगला देशात सर्वात जुना आणि प्रभावी पक्ष असलेला अवामी लीग या वेळी निवडणूक लढवू शकणार नाही. तेथे सत्ता स्थापनेसाठी १५१ जागांचे बहुमत आवश्यक असून या निवडणुकीत तीन मोठ्या पक्षांमध्ये चुरस पाहायला मिळणार आहे. यादरम्यान बांगला देशासंदर्भात एक नवी माहिती समोर आली असून, ती या देशाच्या भवितव्याविषयीची चिंता वाढवणारी आहे.गेल्या काही वर्षांत दक्षिण आशियातील अनेक अर्थव्यवस्थांना परकीय कर्ज, जागतिक चलनवाढ, ऊर्जा संकट आणि राजकीय अनिश्चिततेचा मोठा फटका बसला आहे. त्याच वाटेवर जात, निर्यात, वस्त्रोद्योग आणि स्थिर विकास मॉडेलसाठी ओळखला जाणारा बांगला देशही आता गंभीर आर्थिक दडपणाखाली सापडला आहे. नोबेल विजेते मुहम्मद युनूस यांच्या नेतृत्वाखाली बांगला



देशचा कायापालट होईल, असे अंदाज काही तथाकथित विद्वंतांनी व्यक्त केले होते; परंतु आजची स्थिती पाहता बांगला देशचा आर्थिक गाडा पाकिस्तानप्रमाणेच दिवाळखोरीच्या संकटात रुततो की काय, अशी भीती अनेक आंतरराष्ट्रीय आकलनांमध्ये अधोरेखित केली जात आहे. वर्ल्ड बँकेच्या ताज्या अहवालानुसार बांगला देशवरचा परकीय कर्जाचा बोजा गेल्या पाच वर्षांत तब्बल ४२ टक्क्यांनी वाढला आहे. हे वाढीचे प्रमाण फक्त आकड्यांतले बदल नाहीत, तर त्यामागे देशाच्या विकास नीतीतील बदलांचा फोलपणा दडलेला आहे. मोठ्या प्रकल्पांची निवड आणि कर्जआधारित वाढीवर अवलंबून राहणे यामध्ये बागंला देशची अर्थव्यवस्था अडकलेली दिसत आहे. गेल्या दशकात बांगला देशने अणुऊर्जा प्रकल्प, मेट्रो रेल, पाण्याखालील बोगदे आणि उंच जलदगती महामार्गासारखे महत्त्वाकांक्षी प्रकल्प उभारण्यासाठी मोठ्या प्रमाणावर परकीय कर्ज घेतले. या प्रकल्पांचा दीर्घकालीन फायदा नाकारता येत नसला, तरी परतफेडीची वास्तविक किंमत आता समोर येत आहे. बांगला देशवर कर्जाऊ भांडवल आणि व्याजाच्या परतफेडीचा ताण दुपटीने वाढल्याचे वर्ल्ड बैंक सूचित करते. म्हणजेच विकासाला गती देण्यासाठी घेतलेले कर्जच आता विकासाला अडथळा बनत आहे. ही आर्थिक दृष्ट्या अतिशय धोकादायक स्थिती आहे. कोव्हिड-१९ नंतरचे जागतिक चित्र पूर्वपिक्षा अधिक कठीण बनले आहे,

विकसनशील देशांना मिळणाऱ्या परकीय कर्जाच्या अटी आता अधिक कठोर झाल्या आहेत. सवलतीचा कालावधी कमी, कर्जाची मुदत कमी, तर व्याजदर जास्त या तिन्ही अटी एकत्र आल्यावर कोणत्याही देशाच्या अर्थव्यवस्थेला ताण येणे अपरिहार्य आहे. बांगला देश त्याला अपवाद नाही. पूर्वी बांगला देश 'कमी जोखमीच्या' गटात होता; परंतु आता तो 'मध्यम जोखमी'च्या श्रेणीत आला आहे. परकीय कर्जावर अति अवलंबित्व, महसुली कमकुवतपणा, राजकीय अस्थैर्याची छाया, निर्यातीतील मंदी, आयातीवरील मोठे खर्च आणि आयएमएफच्या कठोर अटी हे पाकिस्तानला आर्थिक खाईत ढकलणारे घटक बांगलादेशाला अडचणीत आणत आहेत. आज जरी बांगला देश पाकिस्तानइतका कंगाल झालेला नसला तरी आकडेवारी ज्या दिशेने इशारा करत आहे, ती दिशा चिंताजनक आहे. जोखमीच्या या पायरीतील बदलाचा अर्थ असा की, बांगला देशचा कर्ज उपयोग, महसुली क्षमता, परतफेडीची क्षमता आणि निर्यात उद्योगातील स्थैर्य यांसंदर्भात आंतरराष्ट्रीय समुदाय अधिक साशंक बनला आहे. बांगला देशने घेतलेल्या मोठ्या प्रकल्पांकडे पाहिले, तर एक महत्त्वाचा प्रश्न उभा राहतो, हे प्रकल्प अर्थव्यवस्थेला तात्पुरता आकर्षक चेहरा देण्यासाठी होते का, की देशाच्या दीर्घकालीन क्षमतावृद्धीसाठी? पाकिस्तानच्या आर्थिक इतिहासातही अनेक भव्य प्रकल्प दिसतात; परंतु ज्यांचे उत्पन्न निर्माण मॉडेल दिले होते.

## संपादकीय »

# कार्यकर्ता भडकला

***महाराष्ट्राच्या राजकारणात तत्त्व व निष्ठा यांना किंमत राहिलेली नसून, केवळ पैसा बोलायला लागला आहे.***

नगरपालिका गरपालिका आणि नगरपरिषद निवडणुकीत महायुतीने बाजी मारली आणि महाविकास आघाडीतील पक्षांचा खुर्दा उडाला. आता राज्यातील महापालिका निवडणुकांची रणधुमाळी जोरात सुरू आहे. २९ महानगरपालिकांच्या निवडणुकीचा धुरळा सध्या पाहायला मिळत आहे. १५ जानेवारी रोजी मतदान पार पडून, १६ जानेवारीला निकाल जाहीर होतील. उमेदवारी अर्ज भरण्याची प्रक्रिया पूर्ण झाली आहे. निवडणूक आयोगाच्या अंतिम अहवालानुसार, राज्यातील सर्व महापालिकांसाठी मिळून तब्बल ३३ हजारांवर उमेदवारांनी अर्ज दाखल केले आहेत. यावेळी राज्यातील २,८६९ नगरसेवक पदांसाठी होणाऱ्या निवडणुकीत राजकीय पक्षांसह अपक्षांनीही मोठ्या प्रमाणावर उडी घेतली आहे. पुणे महापालिकेत १६५ जागांसाठी सर्वाधिक ३,१७९ उमेदवारांनी अर्ज भरले असून, मुंबई महापालिकेत २२७ जागांसाठी २,५१६ जणांनी दंड थोपटले आहेत.

अजित पवारांना वाटू लागले की शरद पवार आपला वारसा सुप्रिया सुळेंकडे देण्याच्या दिशेने जात आहेत. यानंतर त्यांनी उघड बंड केले आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष फोडला. बिहारमध्ये विधानसभा निवडणुकीतील पराभवानंतर राष्ट्रीय जनता दलात भाऊ-बहिणींमधील वारसाहक्काचा संघर्ष उपड झाला.

# नातेसंबंध आणि राजकारण

भारतीय रतीय राजकारणात नाती अनेकदा सत्तेपुढे लहान ठरतात. इतिहास साक्षी आहे की सिंहासन आणि सत्तेसाठीच्या संघर्षात रक्ताचे नातेही टिकत नाही, वडील-मुलगा, भाऊ-भाऊ आणि भाऊ-बहीण यांच्यातील संघर्ष नवीन नाही. मुघल इतिहासापासून आधुनिक राजकारणापर्यंत वाची असंख्य उदाहरणे आढळतात. लोकशाहीत सतेची भाषा बदलली असली, तरी वारशाची भूक बदललेली नाही. त्यामुळेच राजकारणात अनेकदा राखीचा धागाही तुटतो. मात्र सध्याच्या काळात राहुल गांधी आणि प्रियांका गांधी-वधेरा हे या प्रवाहाला अपवाद ठरताना दिसतात. भारतीय राजकारणात घराणेशाहीच्या चर्चेच्या केंद्रस्थानी बहुतांश वेळा गांधी कुटुंब असते. प्रत्यक्षात मात्र जवळपास प्रत्येक राजकीय पक्षात कुठल्या ना कुठल्या स्वरूपात घराणेशाही अस्तित्वात आहे. सध्याच्या राजकारणात दिल्लीच्या राजकारणात राहुल प्रियांका ही जोडी सातत्याने टीकेच्या भोवऱ्यात असते.



देशातील अनेक राज्यांत भाऊ-बहिणीचे राजकारण तणाव आणि फाटाफुटीचे कारण ठरले आहे. तेलंगणापासून सुरुवात केली तर के. चंद्रशेखर राव यांच्या नेतृत्वाखाली स्थापन झालेली तेलंगणा राष्ट्र समिती (नंतरची भारत राष्ट्र समिती) हे त्याचे मोठे उदाहरण आहे. येथे केसीआर यांचा मुलगा के. टी. रामाराव आणि मुलगी के, कविता यांच्यातील वाढता तणाव दीर्घकाळ चर्चेत राहिला. केसीआर मुख्यमंत्री असतानाच बहीण भावातील मतभेद उपड झाले. हळूहळू हा वाद राजकीय वारशाच्या उघड संघर्षात बदलला. के. कविता यांनी वडिलांना लिहिलेले पत्र लीक झाले, ज्यात पक्षाच्या कार्यक्रमात भाजपविरोधात केवळ दोन मिनिटेच का बोलले गेले, असा प्रश्न उपस्थित केला होता. हे पत्र समोर आल्यानंतर कविता यांनी थेट भावावर आरोप केले. भाऊ पक्षाला भाजपसोबत नेण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप केला. त्यानंतर कविता यांना राजकारणात सत्ता आणि वारसाहक्काच्या संघर्षात अनेक ठिकाणी भाऊ-बहिणींची नाती तुटलेली दिसतात. तेलंगणा, आंध्र, महाराष्ट्र, बिहार ते उत्तर प्रदेशपर्यंत अशी उदाहरणे आहेत. मात्र राहुल गांधी आणि प्रियांका गांधी यांचे नाते या प्रवाहाला अपवाद आहे. पक्षाबाहेरचा रस्ता दाखवण्यात आला. पुढे त्यांनी स्वतः चा वेगळा पक्ष स्थापन केला. अशाप्रकारे राजकीय वारशाच्या संघर्षात भावाने बहिणीला बाजूला सारले. आंध्र प्रदेशची कहाणीही वेगळी नाही. वाय. एस. राजशेखर रेड्डी यांच्या निधनानंतर त्यांचा मुलगा वाय. एस. जगनमोहन रेड्डी आणि मुलगी वाय. एस. शर्मिला यांनी एकत्र येत पक्षाला सत्तेपर्यंत नेले. संघर्ष सामायिक होता, मेहनतही संयुक्त होती. मात्र सत्ता मिळताच दुरावा वाढू लागला.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

सावंतांच्या वक्तव्याने खळबळ

## बंडखोरी करणाऱ्या कार्यकर्त्यांना दिला इशारा

# गद्दारी केली तर ठेचून काढणार

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**राज्याच्या राजकारणात २९ महापालिकांच्या निवडणुकीच्या प्रचाराची रणधुमाळी सुरू आहे. या निवडणुकीच्या अनुषंगाने राजकीय घडामोडींना वेग आला आहे. सत्ताधारी महायुतीच्या नेत्यांमध्ये आरोप-प्रत्यारोपाने राजकारण तापल्याचं पाहायला मिळत आहे. असं असताना आगामी जिल्हा परिषदांच्या निवडणुकांसाठी नेते मंडळी आतापासून तयारीला लागले आहेत.**

## वक्तव्यामुळे राजकीय वर्तुळात खळबळ



या पार्श्वभूमीवर धाराशिव जिल्ह्यात शिवसेना (शिंदे) नेते तथा माजी मंत्री तानाजी सावंत यांनी जिल्हा परिषदांच्या निवडणुकीसाठी रणशिंग फुंकलं आहे. तानाजी सावंत यांनी धाराशिव जिल्ह्यात आज एक मेळावा घेतला. मात्र, या मेळाव्यात बोलताना तानाजी सावंत यांनी केलेल्या एका वक्तव्यामुळे राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे.शिवसेनेतील (शिंदे) बंडखोरी करणाऱ्या कार्यकर्त्यांना तानाजी सावंत यांनी धमकीवजा थेट इशाराच दिला आहे. 'निवडणुकीत गद्दारी केली तर ठेचून काढणार', असं मोठं वक्तव्य तानाजी सावंत यांनी केलं आहे. त्यांच्या या वक्तव्यानंतर राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे."बाळासाहेब ठाकरे यांची शिवसेना काय असते? शिवसैनिक काय असतो? गद्दारांची जागा कशा पद्धतीने दाखवली जाते? हे आम्ही त्याला (गद्दारांना) दाखवल्याशिवाय राहणार नाही. जिल्हा परिषद आली काय आणि गेली काय? आम्हाला काही फरक पडत नाही. शिवसेना सत्तेसाठी जन्मलेली नाही, आमचं ब्रीद वाक्यच आहे की ८० टक्के समाजकारण आणि २० टक्के राजकारण. ८० टक्क्यात आम्ही कुठेही कमी पडलो नाही. अतिवृष्टी झाली आम्ही मदत केली. पाऊस पडला, काही ठिकाणी वाडी-वस्त्यांवर जाता येत नव्हतं तर आम्ही स्वखर्चाने रस्ते केले. समोरचा एक नेता दाखवा की त्याने स्वखर्चाने एक रस्ता केला, मी आता राजीनामा देतो", असं तानाजी सावंत यांनी म्हटलं आहे. "मी पुन्हा पुन्हा सांगतो की जर एकमेकांवर तिकीट वाटपावरून खुन्नस काढण्याचा प्रयत्न केला तर तो पुन्हा तीन-चार वर्ष नीट जगता कामा नये. त्याचा बंदोबस्त सर्व शिवसैनिकांनी करायचा. ज्याला जिल्हा परिषदेचा सदस्य व्हायचंय, ज्याला पंचायत समीतीचा सदस्य व्हायचंय, ठीक आहे ना, काहींना कंत्राट वैगेरे करायचे ना, माझ्याकडे या, मी या ठिकाणी आहे ना. तुला सेवा करायचीय? मला माहिती नाही का तुला कोणती सेवा करायचीय? माझ्या केबिनमध्ये गुपचूप ये आणि सांग, साहेब मला तिकीट देऊ नका, पण मला पाच वर्षासाठी हे-हे लागतंय. तुला रुपया लागतोय? मी दोन रुपये देतो. पण निवडणुकीत त्याचं प्रामाणिकपणे काम कर, गद्दारी करायची नाही. जर गद्दारी केली तर त्याला ठेचल्याशिवाय आम्ही शांत बसणार नाही", असं म्हणत तानाजी सावंत यांनी बंडखोरी करणाऱ्यांना कार्यकर्त्यांना इशारा दिला आहे. राज्याच्या राजकारणात २९ महापालिकांच्या निवडणुकीच्या प्रचाराची रणधुमाळी सुरू आहे. या निवडणुकीच्या अनुषंगाने राजकीय घडामोडींना वेग आला आहे. सत्ताधारी महायुतीच्या नेत्यांमध्ये आरोप-प्रत्यारोपाने राजकारण तापल्याचं पाहायला मिळत आहे. असं असताना आगामी जिल्हा परिषदांच्या निवडणुकांसाठी नेते मंडळी आतापासून तयारीला लागले आहेत.

या पार्श्वभूमीवर धाराशिव जिल्ह्यात शिवसेना (शिंदे) नेते तथा माजी मंत्री तानाजी सावंत यांनी जिल्हा परिषदांच्या निवडणुकीसाठी रणशिंग फुंकलं आहे. तानाजी सावंत यांनी धाराशिव जिल्ह्यात आज एक मेळावा घेतला.

### सावंत काय म्हणाले?

मात्र, या मेळाव्यात बोलताना तानाजी सावंत यांनी केलेल्या एका वक्तव्यामुळे राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. शिवसेनेतील (शिंदे) बंडखोरी करणाऱ्या कार्यकर्त्यांना तानाजी सावंत यांनी धमकीवजा थेट इशाराच दिला आहे. 'निवडणुकीत गद्दारी केली तर ठेचून काढणार', असं मोठं वक्तव्य तानाजी सावंत यांनी केलं आहे. त्यांच्या या वक्तव्यानंतर राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे

# "बकासुराच्या तावडीतून मुंबईला सोडवायचंय"

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंची उद्धव ठाकरेंवर बोचरी टीका

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**राज्याच्या राजकारणात २९ महापालिकांच्या निवडणुकीच्या प्रचाराची रणधुमाळी सुरू आहे. या निवडणुकीच्या अनुषंगाने राजकीय घडामोडींना वेग आला आहे. सत्ताधारी महायुतीचा आज मुंबईतील वरळीत मेळावा पार पडला. या मेळाव्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह आदी दिग्गज नेते उपस्थित होते.**





या मेळाव्यात बोलताना एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर जोरदार टीका केली. 'बकासुराच्या तावडीतून मुंबईला सोडवायचं आहे, मुंबईला भ्रष्टाचाराच्या मगरमिठीमधून सोडवायचं आहे', असं म्हणत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर हल्लाबोल केला आहे.आजची सभा ही मुंबईतील भ्रष्टाचाराच्या विरोधातील उठावाच्या ललकाराची सभा आहे. गेल्या एवढ्या वर्षापासून मुंबईला भ्रष्टाचाराची मगरमिठी पडली होती. पण आता आपल्याला या मगरमिठीतून मुंबई आणि मुंबईकरांना सोडवायचं आहे. बकासुराच्या तावडीतून मुंबई बाहेर काढायची आहे. त्यासाठी महायुतीचा बलभीम सज्ज झाला आहे. लाडके मुंबईकर, या मुंबईवर भगवा फडकवल्याशिवाय राहणार नाहीत, मुंबई महापालिकेवर आपल्याला भगवा फडकवायचा आहे आणि मुंबई महापालिकेचा महापौर मराठीच होणार", असं एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे."काही लोकांना निवडणुका आल्या की मराठी माणूस आठवतो. मात्र, या मराठी माणसांसाठी तुम्ही काय केलं? हे सांगा.

एक काम तरी तुम्ही मराठी माणसांसाठी केलं का? त्यांचा (उद्धव ठाकरे यांचा) म मराठीचा नाही, म मलिद्याचा आहे, म मतलबाचा आहे, म मुजोरीचा आहे, वरून किर्तन आणि आतून तमाशा, असं त्यांचं काम आहे. मात्र, आमचा म मराठीचा आहे, आमचा म महाराष्ट्राचा आहे, आमचा म महायुतीचा आहे. त्यांच्यामधील आणि आमच्यामधील हा फरक आहे", अशी टीका एकनाथ शिंदे यांनी केली. "मग तुम्ही २० वर्षांसाठी वेगवेगळे का आणि कोणासाठी झाला होतात? (राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे), आता जनतेने तुमचा बँड वाजवल्यानंतर तुम्हाला ब्रँडची आठवण आली. मात्र, खरा ब्रँड बाळासाहेब ठाकरेच आहेत, त्यानंतर महायुतीचा कार्यकर्ता खरा ब्रँड आहे. बाळासाहेब ठाकरे यांचा विचार, शिवसेनेचा विचार आम्ही जपला आहे.

### शिवसेनेचा विचार आम्ही जपला

राज्याच्या राजकारणात २९ महापालिकांच्या निवडणुकीच्या प्रचाराची रणधुमाळी सुरू आहे. या निवडणुकीच्या अनुषंगाने राजकीय घडामोडींना वेग आला आहे. सत्ताधारी महायुतीचा आज मुंबईतील वरळीत मेळावा पार पडला. या मेळाव्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह आदी दिग्गज नेते उपस्थित होते.

## भाजपचा मास्टरप्लॅन

## महिन्याच पश्चिम बंगालमध्ये विधानसभा निवडणुका

# ममता बॅनर्जींच्या सत्तेला सुरुंग?

| नवी दिल्ली |

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**येत्या काही महिन्याच पश्चिम बंगालमध्ये विधानसभा निवडणुका होणार आहेत. या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्षाकडून आतापासूनच सुरूवात झाली आहे. पश्चिम बंगालमधून ममता बॅनर्जी ( MAMATA BANERJEE) यांना सत्तेतून पायउतार करण्यासाठी भाजपने युद्धपातळीवर काम सुरू केले आहे. यासाठी, तळागाळात संघटना मजबूत केली जात आहे. पंतप्रधान मोदींच्या नावावर आणि कामावर भाजप निवडणूक लढवण्याची तयारी करत आहे. सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, पंतप्रधान मोदी १८ आणि १९ जानेवारी रोजी पश्चिम बंगालमध्ये दोन सभा घेण्याची शक्यता वर्तवली जात आहे. मालदा आणि हावडा येथे या सभा होऊ शकतात, अशी चर्चा आहे.**

## मुस्लिम मतदारांची संख्या लक्षणीय



राज्यात ८२,००० बूथ आहेत. यापैकी ७१,००० बूथवर भाजपने आपले संघटन स्थापन केले आहे. राज्यात सुरू असलेल्या मतदार यादी पुनरीक्षण (SIR) मोहिमेनंतर, बूथची संख्या ९३,००० पर्यंत वाढू शकते. त्यानुसार भाजप आपले संघटन मजबूत करण्यावर लक्ष केंद्रित करत आहे. भाजप नेत्यांच्या मते, मुस्लिम मतदारांची संख्या लक्षणीय असलेल्या बूथवर भाजप जास्त ताकद तैनात करणार नाही.अलिकडेच गृहमंत्री अमित शहा यांनी कोलकाता येथे कार्यकर्त्यांना संबोधित करताना म्हणाले की, भाजपने त्यांच्या दीर्घकालीन कार्यकर्त्यांवर लक्ष केंद्रित करण्याचा निर्णय घेतला आहे. गेल्या १० वर्षांत ३०० हून अधिक भाजप कार्यकर्ते राजकीय हिंसाचाराचे बळी ठरले आहेत. पक्ष अशा कार्यकर्त्यांच्या घरी भेट देईल.

पक्षाचे वरिष्ठ नेते त्यांच्या कुटुंबियांना भेटतील.याशिवाय भाजपने पश्चिम बंगालमधील टीव्ही आणि चित्रपट कलाकारांना दूर ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. पक्षाने प्रत्येक विधानसभा आणि लोकसभा निवडणुकीत या कलाकारांना मोठ्या संख्येने तिकीट दिले आहे. पण त्यानंतरही जनतेचा फारसा पाठिंबा मिळत नसल्याचे दिसून आले. त्याचप्रमाणे सत्ताविरोधी भावना वाढू नये म्हणून टीएमसी, काँग्रेस आणि विरोधी पक्षांमधील कलंकित नेत्यांचे पक्षप्रवेश टाळले जातील भाजपने निवडणूक प्रचार नकारात्मकतेपासून दूर ठेवत सकारात्मक अजेंड्यावर भर देण्याचा पक्षाचा मानस असून, भाजप 'सोनार बांगला' या मुद्द्यावर निवडणूक लढवणार आहे. राज्याचा सर्वांगीण विकास साधणे आणि सुवर्णयुग परत आणणे, हा या प्रचाराचा केंद्रबिंदू असणार आहे.स्थलांतरित मतदारांना सक्षम बनवण्यावर लक्ष केंद्रित करण्याची रणनीती भाजपने आखली आहे. पूर्वांचल, बिहारी, मारवाडी तसेच देशाच्या इतर भागांतील लोकांपर्यंत पोहोचण्यावर पक्ष विशेष भर देणार आहे. पश्चिम बंगालमध्ये रोजगारासाठी इतर राज्यांतून आलेल्या लोकांची संख्या मोठी असल्याने, या स्थलांतरित मतदारांना भाजपच्या बाजूने मतदान करण्यास प्रवृत्त केले जाणार आहे. त्यासाठी त्यांच्या मूळ राज्यांतील कुटुंबीयांशी संपर्क साधून मतप्रभाव टाकण्याची रणनीतीही आखण्यात आली आहे. युवकांना आकर्षित करण्यासाठी भाजप राज्यातील फुटबॉल क्लबमध्येही आपला प्रभाव वाढवणार असून, मेस्सीच्या कोलकाता भेटीदरम्यान निर्माण झालेल्या अनागोंदीचाही प्रचारात उल्लेख केला जाणार असल्याचे सांगण्यात आले आहे.पश्चिम बंगालमध्ये मतदार यादीच्या विशेष सघन पुनरावृत्ती (SPECIAL INTENSIVE REVISION – SIR) प्रक्रियेवरून भारतीय निवडणूक आयोग (ECI) आणि सत्ताधारी तृणमूल काँग्रेस (TMC) यांच्यातील वाद अधिक चिघळला आहे. हे प्रकरण आता न्यायालयात जाण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

## बळी पडलेल्या कामगारांच्या भेटी

निवडणूक आयोगाने तृणमूल काँग्रेसची पक्षाच्या बूथ-स्तरीय एजंट्सना (BLAS) मसुदा मतदार यादीवरील दावे व आक्षेपांच्या सुनावणी सत्रांमध्ये सहभागी होण्याची मागणी फेटाळून लावली आहे. राज्यात सुरू असलेल्या तीन टप्प्यांच्या विशेष सघन पुनरावृत्ती प्रक्रियेचा पहिला टप्पा पूर्ण झाला आहे.  घरोघरी सर्वेक्षण, फॉर्मचे वितरण, फॉर्म भरणे आणि डिजिटल नोंदणी करण्यात आली .

# दिल्लीत श्वास घेणे म्हणजे मृत्यूला आमंत्रण

## खतरनाक बॅक्टेरियावर औषधांचाही होत नाही परिणाम

| नवी दिल्ली |

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**राजधानी दिल्लीमधील हवामान हा एक चिंतेचा विषय बनला आहे. दिल्लीमध्ये हवेची गुणवत्ता खालावली आहे. हवेमध्ये गारवा असल्यामुळे धुक्याचे सावट तर आहेच. पण कडाक्याच्या थंडीमध्ये देखील हवेमध्ये वाढणारे प्रदुषण यामुळे दिल्लीकरांना श्वासाचे आजार होत आहेत.**

यामध्ये आता आणखी एक नवीन समस्या उद्भवली आहे. जेएनयूच्या संशोधनानुसार, दिल्ली-एनसीआरच्या थंड वाऱ्यांमध्ये धोकादायक औषध-प्रतिरोधक जीवाणू आता पसरत आहेत. यामुळे दिल्लीतील लोकांसमोर प्रदूषणासोबतच दुहेरी आव्हान निर्माण झाले आहे.

जवाहरलाल नेहरू विद्यापीठातील (जेएनयू) पर्यावरण विज्ञान शाळेतील संशोधकांचे म्हणणे आहे की हे जीवाणू हवेतील अँटीबायोटिक-प्रतिरोधक स्टेफिलोकोकी आहेत, हे विषाणू दोन्ही म्हणजे घरातील आणि बाहेरील हवेत आढळत आहेत. संशोधकांनी असे नमूद केले आहे की हिवाळ्यात हवेत या जीवाणूंची संख्या वाढते.नेचर जर्नलमध्ये प्रकाशित झालेल्या निकालांवरून असे दिसून येते की या जीवाणूंमध्ये मेथिसिलिन-प्रतिरोधक स्टेफिलोकोकी



(एमआरएस) समाविष्ट आहे, जे सामान्यतः वापरल्या जाणाऱ्या अँटीबायोटिक्सचा प्रतिकार करू शकतात. यामुळे हे स्पष्ट होते की या जीवाणूंमुळे होणाऱ्या संसर्गांवर उपचार करणे अत्यंत कठीण होईल. अशाप्रकारे, दिल्लीतील लोकांना आता प्रदूषित हवा आणि जीवाणूंशी लढण्याची प्रतिकार शक्ती दुहेरी आव्हान आहे.या संशोधनासाठी, दिल्लीतील वेगवेगळ्या ठिकाणांहून हवेचे नमुने घेण्यात आले. या हवेच्या नमुन्यावर चाचणी करत निकर्ष काढण्यात आले आहे. जेव्हा संशोधकांनी चाचणीसाठी शुद्ध बॅक्टेरियाचे प्रकार वेगळे केले तेव्हा त्यांना आढळले की हवेतील ७४ टक्के बॅक्टेरिया प्रतिजैविकांना प्रतिरोधक होते, तर ३६ टक्के स्ट्रेन अनेक औषधांना प्रतिरोधक होते. या अभ्यासादरम्यान, विभागाने स्टेफिलोकोकस बॅक्टेरियाच्या आठ प्रजातींचे विश्लेषण केले. यापैकी दोन बॅक्टेरिया आढळले जे सामान्यतः प्राणी आणि मानवांना संक्रमित करतात.दिल्लीतील हवेच्या गुणवत्तेच्या अभ्यासातील प्रमुख संशोधक माधुरी सिंग म्हणाल्या की, हिवाळ्यात बॅक्टेरियांमध्ये वाढ झाल्यामुळे फुफ्फुस आणि श्वसनाचे संसर्ग या हंगामात अधिक तीव्र आणि जास्त काळ का राहतात.

## औषधे देखील कुचकामी ठरतील

आले की पावसाळ्यात दिल्लीच्या हवेत बॅक्टेरियाचे प्रमाण सर्वात कमी असते. सध्या हिवाळ्यामध्ये दिल्लीचे हवामान अधिक घातक झाले आहे. यामुळे अनेक ठिकाणी तसेच कार्यालयामध्ये एअर प्युरिफायर लावण्यात आले आहेत. तसेच दिल्ली सरकारकडून देखील हवेची स्वच्छता राखण्यासाठी विविध उपाययोजना केल्या जात आहेत.

# रुसलेल्या बायकोसाठी काहीपण!

'लग्नानंतर होईलच प्रेम' या मालिकेत काही दिवसांपूर्वीच जीवा अन् काव्याचं भूतकाळातील नातं सर्वांसमोर उघड झाल्याचा मोठा ट्विस्ट पाहायला मिळाला. भूतकाळ काहीही असला तरीही आता जीवाचं नंदिनीवर आणि काव्याचं तिच्या पार्थ देशमुखांवर जीवापाड प्रेम आहे. जुन्या गोष्टी अशा विचित्र पद्धतीने समोर आल्यामुळे सर्वांनाच धक्का बसतो. परिणामी, नंदिनी देशमुखांचं घर सोडून निघून जाते आणि पार्थ काव्याला सुद्धा इथून निघून जा असा सल्ला देतो. मात्र, आता आपलं प्रेम काहीही करून परत मिळवायचं असा निश्चय काव्याने केलेला आहे. त्यामुळे काव्या आपल्या नवऱ्याची समजूत काढण्यासाठी पुन्हा एकदा देशमुखांच्या घरी परतली आहे. आता पार्थचं मन पुन्हा एकदा जिंकून घ्यायचं असं तिने ठरवलेलं आहे.काव्या देशमुखांच्या घरी परत आली असली तरी नंदिनी अजूनही माहेरीच राहतेय. जीवा आता आपल्या बायकोला समजवण्यासाठी आणि यापूर्वी भूतकाळात केलेल्या चुका सुधारण्यासाठी नंदिनीच्या घरी जाऊन पोहोचला आहे. "आता काहीही करून मी माझ्या बायकोला पुन्हा आमच्या घरी घेऊन जाणार...ती येत तोपर्यंत मी सासुरवाडीत असाच रिक्षात राहणार" असा ठाम निश्चय जीवा करतो.जीवा सासुरवाडीत रिक्षा घेऊन पोहोचतो आणि नंदिनीच्या घराबाहेर तिच्यासाठी "नंदिनी ये ना...." असं गाणं म्हणत उभा राहतो. नंदिनी हा सगळा प्रकार पाहून बाहेर येते आणि जीवाला रागात म्हणते, "तुमचं हे दुकान बांधा आणि परत घरी जा!" एकंदर, मी कुठेच येणार नाहीये असा अंतिम निर्णय ती जीवाला सांगते. पण, तिचा हा निर्णय ऐकून जीवा अजिबात नाराज होत नाही, कारण कुठेतरी त्याला हे अपेक्षितच असतं. यानंतर वॉचमन तिथे येतो आणि म्हणतो, "आता तुम्ही रात्रभर रिक्षात राहणार का?" यावर जीवा त्याला सांगतो, "येस्स! आता मी माझ्या बायकोची समजूत काढणार आणि याच रिक्षाने तिला आमच्या घरी परत नेणार"आता जीवाला यात यश येणार का? हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे. हे विशेष भाग ५ ते ७ जानेवारीदरम्यान सायंकाळी ७ वाजता 'स्टार प्रवाह'वर प्रसारित केले जातील. लग्नानंतर होईलच प्रेम' या मालिकेचा हा रोमँटिक प्रोमो पाहून नेटकऱ्यांना शाहरुख-काजोलचा 'दिलवाले दुल्हनिया ले जायेंगे' सिनेमा आठवला आहे. "आपले मराठी राज-सिमरन...त्यात इथेही मुलीचे वडील हिरोच्या विरोधात आहेत", "एकदम परफेक्ट राज-सिमरन", "नंदिनी जा ना घरी परत", "नंदिनी परत ये ना तुझ्या पसारेवाल्याकडे..." अशा असंख्य प्रतिक्रिया या प्रोमोवर आल्या आहेत. 'लग्नानंतर होईलच प्रेम' या मालिकेत काही दिवसांपूर्वीच जीवा अन् काव्याचं भूतकाळातील नातं सर्वांसमोर उघड झाल्याचा मोठा ट्विस्ट पाहायला मिळाला.

# सीन शूट करताना माझ्या तोंडात च्युइंग गम होतं



ब्रिटीश-पाकिस्तानी अभिनेता अली खान याने 'द आर्चीज'मध्ये खलनायकाची भूमिका केली होती. तसेच त्याने डिझ्नी प्लस हॉटस्टारवरील 'द ट्रायल' सीरिजमध्येही प्रमुख भूमिका साकारली होती. सीरिजमध्ये काजोल महत्त्वाच्या भूमिकेत होती. यामध्ये काजोल व अली खान यांचा रोमान्स दाखवण्यात आला होता. अली व काजोल यांचा 'द ट्रायल'मध्ये किसिंग सीन होता. विशेष म्हणजे अलीने आपल्या पत्नी आणि मुलीबरोबर हा सीन पाहिला होता. एका मुलाखतीत काजोलने या शोसाठी तिची 'नो-किसिंग पॉलिसी' मोडल्याबद्दल अलीला विचारण्यात आलं होतं. "तिची अशी पॉलिसी आहे, याची मला कल्पना नव्हती. याआधी मी काजोलला ओळखत नव्हतो. जेव्हा मी स्क्रिप्ट्स वाचल्या तेव्हाच मला त्यात एक किसिंग सीन असल्याचं समजलं." सेटवर हा किसिंग सीन म्हणजे काही फार मोठी गोष्ट नव्हती, असंही त्याने सांगितलं होतं.विशेष म्हणजे मी माझ्या पत्नीला या सीनबाबत सांगितलं होतं. आम्ही थायलंडमध्ये सुट्टीवर होतो. आम्ही सीरिज बघायला सुरुवात केली तेव्हा मी माझ्या पत्नीसोबत सोफ्यावर बसलो होतो आणि माझी मुलगी दुसऱ्या सोफ्यावर बसली होती. किसिंग सीन आला आणि गेला. त्यांनी माझ्याकडे पाहिलं आणि मी त्यांच्याकडे पाहिलं आणि आम्ही सीरिज पाहिली इतकंच. हे माझे वडील आहेत किंवा हा माझा नवरा आहे, असा विचार कोणीही करत नव्हतं, कोणीही हसलं नाही. प्रेक्षक म्हणून त्यांनी सीरिज पाहिली," असं अलीने सांगितलं होतं.आधी दिलेल्या एका मुलाखतीत इंटिमेट सीन शूट करताना काजोलचा पती अजय देवगण सेटवर उपस्थित नव्हता, असं अली खानने सांगितलं होतं. "सीरिजमध्ये मी तिच्या प्रियकराची, तिच्या बॉसची भूमिका केली आहे. आमच्यात एक फ्रेंच किसचा सीन आहे. आम्ही कॉलेजमध्ये गर्लफ्रेंड-बॉयफ्रेंड होतो. नंतर भेटल्यावर पुन्हा आमचा रोमान्स सुरू होतो, असा सीन आहे. आता हे आमचं काम असल्याने करावं लागतं. खरं तर सीन शूट करताना माझ्या तोंडात च्युइंग गम होती. काजोलच्या पतीचे म्हणजेच अजय देवगणचे प्रॉडक्शन होते. तो त्या दिवशी सेटवर आला नव्हता. आम्ही मुंबईतील एका पॉश हॉटेलमध्ये शूटिंग करत होतो. या सीनसाठी फक्त मोजकेच लोक सेटवर होते," असं अलीने म्हटलं होतं.ब्रिटीश-पाकिस्तानी अभिनेता अली खान याने 'द आर्चीज'मध्ये खलनायकाची भूमिका केली होती. तसेच त्याने डिझ्नी प्लस हॉटस्टारवरील 'द ट्रायल' सीरिजमध्येही प्रमुख भूमिका साकारली.

# अक्षयबद्दल राकेश बेदींची प्रतिक्रिया

अक्षय खन्ना सध्या 'धुरंधर' चित्रपटामुळे चर्चेत आहे. यामध्ये त्याने साकारलेल्या रहमान डकैत या भूमिकेसाठी त्याचं सर्व जण कौतुक करत आहेत. चित्रपटातील नायकापेक्षाही खलनायकाची जास्त चर्चा होताना दिसते. अशातच आता या चित्रपटातील एका अभिनेत्याने अक्षय खन्नाबद्दल सांगितलं आहे.५ डिसेंबर २०२५ रोजी प्रदर्शित झालेला आदित्य धर लिखित व दिग्दर्शित 'धुरंधर' चित्रपटात बॉलीवूडमधील लोकप्रिय कलाकारांनी महत्त्वपूर्ण भूमिका साकारल्या आहेत. यापैकीच एक अभिनेता म्हणजे राकेश बेदी. चित्रपटात राकेश बेदी यांनी भ्रष्टाचारी पाकिस्तानी नेते जमील जमाली ही भूमिका साकारली आहे. चित्रपटात राकेश बेदी यांचे अक्षय खन्नासह बरेच सीन्स पाहायला मिळतात. अशातच आता त्यांनी अक्षय खन्ना सेटवर कसा असायचा आणि त्या दोघांमध्ये काय बोलणं व्हायचं याबद्दल सांगितले आहे. फरीदून शहरयरसह संवाद साधताना अक्षय खन्नाबद्दल राकेश बेदी म्हणाले, "मी अशा स्वभावाचा व्यक्ती आहे की मी सेटवर सगळ्यांबरोबर गप्पा मारतो, सगळ्यांबरोबर विनोद करतो. पण, अक्षय खन्ना थोडा वेगळा आहे. तो एका कोपऱ्यात शांतपणे बसून त्याची पुस्तकं वाचायचा, फोनमध्ये बघायचा. पण, जेव्हा केव्हा आमच्यामध्ये बोलणं व्हायचं तेव्हा आमच्यामध्ये खूप महत्त्वपूर्ण संवाद झाला.

# सकाळी गीता वाचायचा, रात्री पत्र

अमिताभ बच्चन बॉलीवुडमधील लोकप्रिय अभिनेते आहेत. प्रेक्षकांसह अनेक कलाकारही त्यांचे चाहते आहेत. अनेकदा त्यांचे सहकलाकार मुलाखतींमधून बिग बींबरोबर काम करण्याचा अनुभव सांगत असतात. अशातच आता ज्येष्ठ अभिनेते रणजित यांनी अमिताभ बच्चन यांच्याबद्दल सांगितलं आहे. रणजित यांनी नुकत्याच दिलेल्या मुलाखतीत अमिताभ बच्चन यांचं सेटवर रुटीन कसं असायचं याबद्दलची माहिती दिली आहे. यावेळी ते शूटिंगमध्ये असतानाही त्यांच्या कुटुंबीयांबरोबर संपर्क कसा साधायचे हेसुद्धा सांगितलं आहे. 'अल्फा निऑन स्टुडिओज'ला दिलेल्या मुलाखतीमध्ये रणजित यांनी याबद्दलची माहिती केली आहे.अमिताभ बच्चन सेटवर कसे असतात, ते किती शिस्तप्रिय आहेत यांबद्दल अनेक कलाकार मुलाखतींमधून सांगत असतात. रणजित यांनीसुद्धा याबद्दल आता सांगितलं आहे. बिग बींबद्दल ते म्हणाले, "आम्ही पहिल्यांदा 'रेश्मा और शेरा' या चित्रपटात एकत्र काम केलं. हा त्याचा दुसरा चित्रपट होता. त्यापूर्वी त्यानं 'सात हिंदुस्तानी' या चित्रपटात काम केलं होतं. शूटिंगदरम्यान सेटवर आम्ही एकाच टेंटमध्ये होतो.

# प्रियाचे फोटो पाहून नेटकरी झाले थक्क



प्रिया बापट आणि उमेश कामत यांच्याकडे मराठी कलाविश्वातील एव्हरग्रीन जोडी म्हणून पाहिलं जातं. लग्नाआधी जवळपास ८ वर्षे एकमेकांना डेट केल्यावर २०११ मध्ये प्रिया-उमेशने लग्नगाठ बांधली. मराठमोळ्या पद्धतीत या दोघांचा लग्नसोहळा पार पडला होता. उमेश-प्रियाचा चाहतावर्ग मोठ्या प्रमाणात आहे. सोशल मीडियावर त्यांचे एकत्र फोटो, REEL व्हिडीओ नेहमीच व्हायरल होत असतात. सध्या प्रिया-उमेशच्या अशाच एका पोस्टने सर्वांचं लक्ष वेधून घेतलं आहे. ही पोस्ट आहे फिटनेस संदर्भातली... नव्या वर्षात सर्वत्र प्रिया-उमेशच्या फिटनेसची चर्चा होताना दिसतेय. हे दोघंही फिटनेस फ्रीक आहेत. त्यांनी नुकत्याच शेअर केलेल्या फोटोंची सध्या सर्वत्र चर्चा रंगली आहे. या फोटोंमध्ये दोघांचंही थक्क करणारं ट्रान्सफॉर्मेशन पाहायला मिळत आहे. उमेश-प्रियाने जिममध्ये हे खास फोटोशूट केलं आहे. या फोटोंमध्ये अभिनेत्याचे सिक्स पॅक ॲब्स पाहायला मिळत आहेत. हे फोटो पाहून चाहत्यांसह मराठी कलाकार सुद्धा थक्क झाले आहेत. प्रिया व उमेश दोघंही या फोटोंमध्ये एकत्र वर्कआऊट करत असल्याचं पाहायला मिळत आहे. म्हणूनच प्रियाने या फोटोंना "STRENGTH LOOKS BETTER TOGETHER" असं कॅप्शन दिलं आहे. दोघांचा हा नवा, हटके लूक चाहत्यांच्या पसंतीस उतरला आहे.

## फुटबॉल प्रशासनाचे अपयश

## फुटबॉल खेळाडूंच्या समर्थनार्थ अरविंद केजरीवाल

# खेळात राजकारण आणणे योग्य नाही

**| मुंबई |**
**प्रतिनिधी : महाईन्यूज**

**भारतीय फुटबॉल सध्या सर्वात गंभीर संकटाचा सामना करत आहे. जानेवारी २०२६ आला आहे, परंतु २०२५-२६ इंडियन सुपर लीग (आयएसएल) हंगाम अद्याप सुरू झालेला नाही. जुलै २०२५ पासून ही लीग अनिश्चित काळासाठी स्थगित करण्यात आली आहे. हे केवळ एका स्पर्धेच्या निलंबनाबद्दल नाही तर हजारो खेळाडू, प्रशिक्षक, सहाय्यक कर्मचारी आणि लाखो चाहत्यांच्या स्वप्नांबद्दल आहे. परिस्थिती इतकी बिकट झाली आहे की भारतीय फुटबॉलमधील काही मोठी नावे – राष्ट्रीय संघाचा कर्णधार सुनील छेत्री, महान गोलकीपर गुरप्रीत सिंग संधू, वरिष्ठ बचावपटू संदेश झिंगन आणि ह्यूगो बौमस सारखे काही परदेशी आयसीएल खेळाडू – यांना २ जानेवारी २०२६ रोजी एक संयुक्त व्हिडिओ जारी करावा लागला, ज्यामध्ये थेट फिफाला हस्तक्षेप करण्याची विनंती करण्यात आली.**

## केजरीवालांचे उघडपणे भाष्य






आंतरराष्ट्रीय संस्थेला खेळाडूंनी केलेले हे आवाहन भारतीय फुटबॉल प्रशासनातील गंभीर अपयश आणि वर्षानुवर्षे चाललेल्या अराजकतेचा पर्दाफाश करते. सध्याची परिस्थिती अशी आहे की खेळाडूंचे करिअर ठप्प झाले आहे, तरुण प्रतिभा संधींपासून वंचित आहेत आणि अनेक क्लब आर्थिकदृष्ट्या संघर्ष करत आहेत. परदेशी खेळाडू इतर लीगसाठी भारत सोडून जात आहेत, तर भारतीय खेळाडू आणि सपोर्ट स्टाफ सामन्यांशिवाय, उत्पन्नाशिवाय आणि त्यांच्या भविष्याबद्दल स्पष्टतेशिवाय अडकून पडले आहेत. आयसीएल सोबतच, आय-लीग आणि खालच्या विभागातील स्पर्धा देखील या संकटाचा परिणाम आहेत.आम आदमी पक्षाचे राष्ट्रीय संयोजक अरविंद केजरीवाल यांनी या मुद्द्यावर उघडपणे भाष्य केले आहे. त्यांनी ट्विट केले आहे की भारतीय फुटबॉल आज एका महत्त्वाच्या टप्प्यावर आहे, जिथे जर आता योग्य आणि प्रामाणिक निर्णय घेतले नाहीत तर येत्या काळात हा खेळ पूर्णपणे नष्ट होईल.आणि जेव्हा खेळाडूंना खेळ वाचवण्यासाठी फिफा आणि सरकारकडे आवाहन करावे लागते तेव्हा ते वर्षानुवर्षे चाललेल्या गैरव्यवस्थापन आणि दुर्लक्षाचे परिणाम आहे. त्यांनी स्पष्टपणे सांगितले की खेळाला राजकारण आणि सत्ता संघर्षाची नाही तर पारदर्शक प्रशासन, जबाबदारी आणि खेळाडूंचा आदर आवश्यक आहे.अरविंद केजरीवाल यांचे हे पाऊल आज निराश आणि दुखावलेल्या लाखो चाहत्यांच्या भावनांना जागृत करत आहे. स्टेडियम रिकामे आहेत,

## सरकार किती आंधळे राहील?

आंतरराष्ट्रीय संस्थेला खेळाडूंनी केलेले हे आवाहन भारतीय फुटबॉल प्रशासनातील गंभीर अपयश आणि वर्षानुवर्षे चाललेल्या अराजकतेचा पर्दाफाश करते. सध्याची परिस्थिती अशी आहे की खेळाडूंचे करिअर ठप्प झाले आहे, तरुण प्रतिभा संधींपासून वंचित आहेत आणि अनेक क्लब आर्थिकदृष्ट्या संघर्ष करत आहेत. परदेशी खेळाडू इतर लीगसाठी भारत सोडून जात आहेत, तर भारतीय खेळाडू आणि सपोर्ट स्टाफ सामन्यांशिवाय, उत्पन्नाशिवाय आणि त्यांच्या भविष्याबद्दल स्पष्टतेशिवाय अडकून पडले आहेत.

तरुण खेळाडू निराश आहेत आणि देशातील सर्वात लोकप्रिय खेळांपैकी एक प्रशासकीय राजकारणाचे बळी पडत असल्याचे दिसून येते. प्रश्न असा आहे की: केंद्रातील भाजप सरकार किती काळ आंधळे राहील? खेळाडूंचे आणि देशाच्या खेळाचे भविष्य केवळ सत्तेच्या खेळांचे बळी राहील का? आज, देशातील लोक भारतीय फुटबॉलपटूंबद्दल सहानुभूती बाळगतात. खेळाडू कोणतीही मागणी करत नाहीत; त्यांना फक्त खेळण्याचा आणि आदराचा अधिकार हवा आहे. भारत आणि त्याचे उत्साही फुटबॉल चाहते अधिक चांगल्यासाठी पात्र आहेत. सत्तेच्या राजकारणापेक्षा वर उठून खेळ आणि खेळाडूंना वाचवण्याची अजूनही वेळ आहे, अन्यथा हे संकट भावी पिढ्यांच्या स्वप्नांना चकनाचूर करेल. भारतीय फुटबॉल सध्या सर्वात गंभीर संकटाचा सामना करत आहे. जानेवारी २०२६ आला आहे, परंतु २०२५-२६ इंडियन सुपर लीग (आयएसएल) हंगाम अद्याप सुरू झालेला नाही. जुलै २०२५ पासून ही लीग अनिश्चित काळासाठी स्थगित करण्यात आली आहे. हे केवळ एका स्पर्धेच्या निलंबनाबद्दल नाही तर हजारो खेळाडू, प्रशिक्षक, सहाय्यक कर्मचारी आणि लाखो चाहत्यांच्या स्वप्नांबद्दल आहे. फुटबॉलमधील काही मोठी नावे – राष्ट्रीय संघाचा कर्णधार सुनील छेत्री, महान गोलकीपर गुरप्रीत सिंग संधू, वरिष्ठ बचावपटू संदेश झिंगन आणि ह्यूगो बौमस सारखे काही परदेशी आयसीएल खेळाडू – यांना २ जानेवारी २०२६ रोजी एक संयुक्त व्हिडिओ जारी करावा लागला.

# स्टब्स आणि रिकेल्टनला दिला डच्चू!

## मार्करामच्या हातात कमान, 7 खेळाडूंना पहिल्यांदाच विश्वचषकाची तिकिटे

**| मुंबई |**
**प्रतिनिधी : महाईन्यूज**

**२०२४ टी-२० विश्वचषक उपविजेत्या दक्षिण आफ्रिकेने शुक्रवारी २०२६ च्या आयसीसी पुरुष टी-२० विश्वचषक स्पर्धेसाठी त्यांच्या १५ सदस्यीय संघाची घोषणा केली. भारत आणि श्रीलंकेत होणाऱ्या या स्पर्धेसाठी एडेन मार्कराम संघाचे नेतृत्व करेल. कागिसो रबाडा संघात परतला आहे, तर सात खेळाडू विश्वचषक स्पर्धेत पदार्पण करणार आहेत.**




दक्षिण आफ्रिकेसाठी सर्वात मोठी आनंदाची बातमी म्हणजे कागिसो रबाडाचे पुनरागमन. हा अनुभवी वेगवान गोलंदाज बरगडीच्या दुखापतीमुळे भारताविरुद्धच्या अलिकडच्या एकदिवसीय मालिकेत खेळू शकला नाही. तथापि, तो आता पूर्णपणे बरा झाला आहे आणि विश्वचषकासाठी तंदुरुस्त आहे. रबाडाच्या पुनरागमनामुळे दक्षिण आफ्रिकेच्या वेगवान गोलंदाजीला बळकटी मिळेल. ॲनरिच नोर्टजेचाही संघात समावेश करण्यात आला आहे. केशव महाराज आणि जॉर्ज लिंडे यांना फिरकी विभागात समाविष्ट करण्यात आले आहे.

## ट्रॉफीची प्रतीक्षा संपवण्याची आशा

हा एक आव्हानात्मक गट आहे, न्यूझीलंड आणि अफगाणिस्तानमध्ये कठीण स्पर्धा होण्याची अपेक्षा आहे. दक्षिण आफ्रिका ९ फेब्रुवारी रोजी अहमदाबादमध्ये कॅनडाविरुद्धच्या टी२० विश्वचषक २०२६ मोहिमेची सुरुवात करेल. २०२४ मध्ये उपविजेतेपद पटकावल्यानंतर, दक्षिण आफ्रिका जेतेपद जिंकण्याची आणि अखेर आयसीसी व्हाईट-बॉल ट्रॉफीची त्यांची दीर्घ प्रतीक्षा संपवण्याची आशा बाळगेल.

डावखुरा फिरकी गोलंदाज क्वेना म्फाकाचीही संघात निवड करण्यात आली आहे.फलंदाजी क्रमातील काही प्रमुख खेळाडूंना दुर्लक्षित करण्यात आले आहे. यष्टीरक्षक-फलंदाज रायन रिकेल्टनला संघातून वगळण्यात आले आहे, तर मधल्या फळीतील फलंदाज ट्रिस्टन स्टब्सलाही वगळण्यात आले आहे. निवडकर्त्यांनी जेसन स्मिथला संधी दिली आहे, त्याने आतापर्यंत फक्त दोन टी-२० आंतरराष्ट्रीय सामने खेळले आहेत.डोनोव्हन फरेरा यांना संघात स्थान देण्यात आले आहे. दोघेही मधल्या फळीला बळकटी देतील. अनुभवी खेळाडू क्विंटन डी कॉक आणि डेव्हिड मिलर हे संघातील महत्त्वाचे खेळाडू आहेत.

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज™

ePaper

epaper.mahaenews.com

। रविवार ।

दि. 4 जानेवारी 2026

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

# अध्यात्मिक गुरु संत सिद्धेश्वर महास्वामीजी यांचे तृतीय पुण्यस्मरण!

## शिक्षण विश्व: अध्यात्मिक कार्याची स्मृती व श्रद्धांजली समारंभात अभिवादन




। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**अध्यात्मिक गुरु पूज्यपाद सिद्धेश्वर महास्वामीजी यांचे तृतीय पुण्यस्मरण आज संत साई इंग्लिश मीडियम हायस्कूल येथे श्रद्धांजली अर्पण करून साजरे करण्यात आले.**

स्मृती दिनाच्या पूर्वसंध्येला स्वामीजींच्या जन्मगावी बिजरगी, कर्नाटक येथे ४०० हून अधिक बैलगाड्यांच्या उपस्थितीत त्यांच्या फोटो प्रतिमेची भव्य दिव्य मिरवणूक काढण्यात आली. या सोहळ्यात स्थानिक नागरिकांबरोबरच शाळेचे संस्थापक ढवळेश्वर सर देखील सहभागी झाले. स्मरण सोहळा पुष्पहार अर्पण, गंधलेपन आणि धूप-दीप प्रज्वलित करून सुरू झाला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्वेता नारायणगावकर यांनी केले. शाळेतील शिक्षक, विद्यार्थी आणि विद्यार्थीनी उपस्थित होते. श्लोक पठण करून स्वामीजींना अभिवादन करण्यात आले. स्वामीजींचे आध्यात्मिक व धार्मिक कार्य अत्यंत अनमोल आहे. विद्वत्ता व प्रभावी वक्तृत्वासाठी प्रसिद्ध असलेले स्वामीजी विजयपुरा येथील ज्ञानयोगाश्रमचे संस्थापक आहेत. त्यांनी उपनिषदे, भगवद्गीता, शरणतत्त्वज्ञान आणि सामान्य अध्यात्म यावर अनेक पुस्तकांचे लेखन केले. स्वामीजींचे वक्तव्य मृदू व विनयशील होते. सन्माननीय संस्थापक अध्यक्ष शिवलिंगजी ढवळेश्वर सर यांनी सांगितले की, तीन वर्षांपूर्वी स्वामीजींचे देहावसान झाले, तरी त्यांचे विचार व आचार आपल्याबरोबर कायम राहतील. स्वामीजींनी अनेकांना आध्यात्मिक मार्गदर्शन करून जीवनात सकारात्मकतेचा मार्ग दाखविला आहे. स्वामीजी यांना पद्मभूषण पुरस्कार जाहीर झाला होता, तो त्यांनी नम्रपणे नाकारला.

> “ श्वासागणिक जीवनाचे शाश्वत सिद्धांत कथन करणारे आध्यात्मिक ज्ञानाचे विद्यापीठ चालते-बोलते संत म्हणजेच पूज्यपाद सिद्धेश्वर महास्वामीजी. त्यांच्या साहित्यरुपी विचार आणि अनमोल कार्य सदैव आपल्यासाठी मार्गदर्शक ठरेल.
>
> **–शिवलिंगजी ढवळेश्वर, संस्थापक अध्यक्ष.**

स्मरण सोहळ्यात सुनीता ढवळेश्वर, मनोज वाबळे, काशिनाथ कतनाळी आणि भारती ढवळेश्वर उपस्थित होते.

# पिंपरी-चिंचवडमध्ये शिवसैनिकांचा निर्धार, विजयाचा हुंकार!

## मिशन-PCMC: भगवा फडकवण्यासाठी उदय सामंत यांनी फुंकले रणशिंग

। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**“शिवसेना हा केवळ राजकीय पक्ष नसून तो एक प्रखर विचार आहे. आगामी महानगरपालिका निवडणुकीत पिंपरी-चिंचवडच्या सर्वांगीण विकासासाठी आणि सर्वसामान्यांच्या न्याय्य हक्कासाठी प्रत्येक शिवसैनिकाने आतापासूनच ‘विजयाचा हुंकार’ बुलंद करावा,” असे प्रतिपादन राज्याचे उद्योगमंत्री तथा पुणे जिल्हा शिवसेना संपर्क मंत्री ना. उदयजी सामंत यांनी केले.**




वाकड येथील ‘हॉटेल टिपटॉप’ मध्ये आगामी महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ च्या पार्श्वभूमीवर शिवसेनेच्या अधिकृत उमेदवारांची व प्रमुख पदाधिकाऱ्यांची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते. या बैठकीमुळे शहरातील शिवसैनिकांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले असून निवडणुकीचे रणशिंग फुंकले गेले आहे.

### रणनीतीवर चर्चा आणि कार्यकर्त्यांना बळ

यावेळी उदय सामंत यांनी आगामी निवडणुकीच्या व्यूहरचनेबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. “शहरातील प्रत्येक प्रभागात शिवसेनेची ताकद पोहोचवणे आवश्यक आहे. महापालिकेत जनहिताचे निर्णय घेण्यासाठी शिवसेनेची सत्ता असणे ही काळाची गरज आहे,” असे त्यांनी स्पष्ट केले. दिग्गजांची उपस्थिती....

या बैठकीला मावळ लोकसभेचे ‘महासंसद रत्न’ खासदार श्रीरंग आप्पा बारणे यांची प्रमुख उपस्थिती होती. त्यांनी शहरातील प्रलंबित प्रश्न आणि महापालिकेतील भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी शिवसेनेच्या नगरसेवकांची गरज असल्याचे मत व्यक्त केले. यावेळी शिवसेना उपनेते इरफानभाई सय्यद आणि उपनेत्या सुलभाताई उबाळे यांनीही निवडणुकीच्या पूर्वतयारीचा आढावा घेत कार्यकर्त्यांना सूचना केल्या.

### संघटनेची वज्रमूठ...

या ऐतिहासिक बैठकीला युवासेना पश्चिम महाराष्ट्र सचिव विश्वजीत बारणे, जिल्हा प्रमुख राजाभाऊ खांडभोर, जिल्हा समन्वयक बाळासाहेब वाल्हेकर, महिला जिल्हा प्रमुख शिलाताई भोंडवे, महानगर प्रमुख राजेश वाबळे, शहर प्रमुख निलेश तरस यांसह युवासेना जिल्हा प्रमुख सागर पाचरणे, राजेंद्र तरस आणि युवतीसेना अध्यक्ष सायलीताई साळवी यांच्यासह असंख्य पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. या बैठकीने पिंपरी-चिंचवडमधील राजकीय वातावरण तापले असून शिवसेनेने विजयासाठी कंबर कसल्याचे चित्र दिसत आहे.

# प्रभाग 8 मध्ये 'राष्ट्रवादी'चा शंखनाद;

# इंद्रायणी नगरातील श्री गणेश मंदिरात प्रचाराचा शुभारंभ!

## मिशन- PCMC : नागरिकांना विश्वासाची ताकद, विकासाची हमी

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज



**पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीत २०२५-२६ चा रणसंग्राम आता खऱ्या अर्थाने पेटला आहे. प्रभाग क्रमांक ८ मधील राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) यांच्या महाविकास आघाडीच्या अधिकृत उमेदवारांचा प्रचाराचा भव्य शुभारंभ शुक्रवार, दि. ३ जानेवारी रोजी उत्साहात पार पडला.**

इंद्रायणी नगर येथील सेक्टर २ मधील श्री गणेश मंदिरात श्रीफळ वाढवून उमेदवारांनी विजयाचा निर्धार व्यक्त केला. सकाळी ९:३० वाजता गणरायाची आरती करून प्रचाराला सुरुवात झाली. या वेळी दोन्ही गटांचे प्रमुख पदाधिकारी, कार्यकर्ते आणि स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

"प्रभाग आठचा विकास, हाच आमचा ध्यास" अशी घोषणेने परिसर दणाणून गेला. गणेश मंदिरातून सुरू झालेली प्रचार रॅली प्रभागातील विविध भागांत पोहोचली. प्रचाराचा मार्ग आणि जनसंपर्क : धार्मिक स्थळांचे आशीर्वाद: श्री साई मंदिर, दुर्गामाता मंदिर, हनुमान मंदिर, दत्त मंदिर आणि राधाकृष्ण मंदिर येथे दर्शन घेऊन उमेदवारांनी जनसंपर्क साधला. सोसायट्यांमध्ये संवाद: पूर्ण सोसायटी आणि आजूबाजूच्या रहिवासी क्षेत्रांमध्ये पदयात्रा काढली. व्यापाऱ्यांशी चर्चा: मिनी मार्केट आणि राजवाडा परिसरात व्यावसायिकांच्या समस्या जाणून घेत उमेदवारांनी परिवर्तनाचे आवाहन केले.

### विकासावर भर...

प्रचारादरम्यान उमेदवारांनी स्थानिक नागरिकांशी संवाद साधताना पायाभूत सुविधा, पाणीप्रश्न आणि प्रभागातील सुरक्षिततेला प्राधान्य देण्याचे आश्वासन दिले. राष्ट्रवादीच्या दोन्ही गटांच्या एकजुटीमुळे कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाची लाट निर्माण झाली असून, प्रभाग ८ मधील निवडणूक लढत अधिक चुरशीची होणार असल्याचे चित्र दिसत आहे.

> "प्रभाग ८ चा विकास हे फक्त आमचे ध्येय नाही, तर प्रत्येक नागरिकाच्या दैनंदिन आयुष्यात सकारात्मक बदल घडवण्याची आमची प्रतिज्ञा आहे. आपली साथ आणि विश्वास आमच्यासाठी प्रेरणेचा स्रोत आहे. आपण एकत्र पावल टाकले, तर प्रभागात खरी प्रगती नक्की दिसेल.
>
> **–तुषार सहाणे,** उमेदवार, राष्ट्रवादी, प्रभाग- 8.

# माणगाव (ताम्हिणी घाट) बस अपघात : ४२ जखमींवर तातडीने उपचार सुरू!

## पिंपरी येथील डॉ. डी. वाय. पाटील मेडिकल कॉलेज, हॉस्पिटल संशोधन केंद्रात उपचार

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**माणगाव तालुक्यातील ताम्हिणी घाट परिसरात झालेल्या भीषण बस अपघातात पुण्यातील भोसरी येथील सावन आयबी प्रा लि.कंपनीत कार्यरत असलेले कर्मचारी गंभीर जखमी झाले असून, त्यांच्यावर पिंपरी, पुणे येथील डॉ. डी. वाय. पाटील मेडिकल कॉलेज व हॉस्पिटल केंद्रामध्ये तातडीने आवश्यक शस्त्रक्रिया व वैद्यकीय उपचार करण्यात आले आहे. या ४२ रुग्णांपैकी २७ पुरुष व १५ महिला आहेत. यामध्ये हाडांच्या २५ शस्त्रक्रिया, चेहऱ्यावरील आणि जबड्यांच्या ३ शस्त्रक्रिया आणि ११ रुग्णांवर सामान्य शस्त्रक्रिया व उपचार सुरू आहेत. सद्या सर्व रुग्णांची प्रकृती स्थिर असून सर्व रुग्ण धोक्या बाहेर आहेत.**



भोसरी येथून कर्मचारी सहलीसाठी निघाले. एका खासगी बसने पुणे ते काशीद असा प्रवास करत होते. मौजे सणसवाडी, ता. माणगाव हद्दीतील ताम्हिणी घाटात काल (शुक्रवार ०२ जानेवारी २०२६) सकाळी अंदाजे ११.१५ ते ११.३० वाजण्याच्या सुमारास वाहन चालकाचे नियंत्रण सुटल्याने ही बस एका कार ला धडक देत डोगराच्या खडकावर आदळली, सदर बसचा भीषण अपघात झाला. या बसमध्ये अंदाजे ५० प्रवासी प्रवास करत होते.

या अपघातात जखमी झालेल्या रुग्णांना माणगाव उपजिल्हा रुग्णालयात प्राथमिक उपचार दिल्यानंतर ४२ जखमींना रात्री ९ वाजता डॉ. डी. वाय. पाटील मेडिकल कॉलेज व हॉस्पिटल संशोधन केंद्र, पिंपरी पुणे येथे तातडीने दाखल करण्यात आले आहे. दाखल सर्व रुग्णांवर तज्ज्ञ डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली आवश्यक शस्त्रक्रिया व वैद्यकीय उपचार सुरू आहेत.

डॉ. भाग्यश्री पाटील, प्र कुलपती, डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ, पिंपरी, पुणे (अभिमत विद्यापीठ), म्हणाले, "अपघातानंतर रुग्णांवर योग्य वेळी उपचार होणे फार महत्त्वाचे असते. त्यासाठी आधीपासून तयारी असणे आणि सर्वांनी एकत्र काम करणे गरजेचे असते. अपघाताची माहिती मिळताच आमच्या रुग्णालयातील डॉक्टर, नर्सेस आणि सर्व कर्मचारी एकाच वेळी कामाला लागले, त्यामुळे प्रत्येक रुग्णाला कोणताही उशीर न होता तात्काळ उपचार आणि आवश्यक तज्ज्ञांची मदत मिळू शकली."

अपघात ग्रस्त रुग्ण उपचारासाठी येणार असल्याची माहिती मिळताच रुग्णालयाची संपूर्ण वैद्यकीय यंत्रणा तात्काळ कार्यान्वित करण्यात आली. रुग्णालयातील अनुभवी डॉक्टर, पॅरामेडिकल स्टाफ, नर्सिंग टीम तसेच आपत्कालीन सेवा पूर्ण क्षमतेने व समन्वयाने कार्यरत असून, २४ तास अखंड रुग्णसेवा दिली जात त्यासाठी आम्ही सक्षम आहोत असे डॉ. यशराज पाटील, विश्वस्त व खजिनदार, डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ, पिंपरी पुणे, तसेच ते पुढे म्हणाले अपघातातील सर्व रुग्णांची प्रकृती स्थिर ठेवण्यासाठी व त्यांना सर्वोत्तम उपचार देण्यासाठी रुग्णालय प्रशासनाकडून युद्धपातळीवर प्रयत्न सुरू आहेत.

डॉ. रेखा आर्कोट, अधिष्ठाता, डॉ. डी. वाय. पाटील मेडिकल कॉलेज, हॉस्पिटल व संशोधन केंद्र, पिंपरी, पुणे. म्हणाले "मोठ्या संख्येने ट्रॉमा रुग्ण दाखल होत असताना त्यांचे नियोजनबद्ध व्यवस्थापन अत्यंत महत्त्वाचे असते.

### अपघातग्रस्त रुग्णांवर तातडीचे उपचार

अपघातग्रस्त रुग्ण दाखल होताच त्यांची तातडीने प्राथमिक तपासणी करून आवश्यक वैद्यकीय चाचण्या व तज्ज्ञांकडून मूल्यांकन करण्यात आले, अशी माहिती आपत्कालीन वैद्यकीय विभागाच्या प्रमुख डॉ. सरबरी स्वैका यांनी दिली. बहुतेक रुग्णांमध्ये हाडे मोडणे, चेहरा व जबड्याच्या शस्त्रक्रियेची गरज तसेच सामान्य शस्त्रक्रियेचे प्रकार आढळून आल्याने त्यानुसार संबंधित विभागांत वर्ग करून तात्काळ उपचार सुरू करण्यात आले. सर्व विभागांमध्ये समन्वय राखत अखंड सेवा दिली जात असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. दरम्यान, वैद्यकीय अधीक्षक डॉ. एच. एच. चव्हाण यांनी सांगितले की, रुग्णालयात दाखल होताच सर्व रुग्णांना त्वरित आणि आवश्यक उपचार देण्यात आले. विविध तज्ज्ञ विभागांच्या समन्वयातून वैद्यकीय व शस्त्रक्रियात्मक उपचार सुरू आहेत.

## पिंपळे सौदागर परिसरातील

# प्रभाग 28 मध्ये अनिताताई काटे यांचा थेट संवाद!

## मिशन- PCMC : नागरिकांशी थेट संवादातून विकासाची दिली ग्वाही!




। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपळे सौदागर परिसरातील प्रभाग क्रमांक २८ मध्ये पिंपरी-चिंचवड महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपच्या अधिकृत उमेदवार अनिताताई संदीप काटे यांनी नागरिकांशी थेट संवाद साधला. या भेटीच्या माध्यमातून त्यांनी केवळ प्रचार न करता, आपल्या कार्यशैलीची बांधिलकी आणि नागरिकांशी असलेले जपलेले नाते अधोरेखित केले.**

अनिताताई काटे यांनी नागरिकांच्या समस्यांवर लक्ष केंद्रित करत, पाणीपुरवठा, रस्त्यांची दुरवस्था, वाहतूक कोंडी, ड्रेनेज, कचरा व्यवस्थापन, उद्याने आणि सार्वजनिक सुविधा यांसह विविध क्षेत्रातील प्रश्न जाणून घेतले. प्रत्येक समस्येवर ठोस उपाययोजना करण्याची ग्वाही त्यांनी नागरिकांना दिली.

स्थानीय नागरिकांनी अनिताताई काटे यांच्या कार्यपद्धतीवर विश्वास व्यक्त करत, त्या नेहमी उपलब्ध असलेल्या आणि प्रश्न सोडवणाऱ्या लोकप्रतिनिधी असल्याचे सांगितले.

विशेषतः महिला, ज्येष्ठ नागरिक आणि तरुण वर्गाकडून त्यांना उत्स्फूर्त प्रतिसाद मिळताना दिसून आला. या संवादातून प्रचाराच्या पलीकडे जाऊन जनतेशी जपलेले नाळ, विश्वासाचे नाते आणि विकासाची ठोस दिशा पुन्हा एकदा अधोरेखित झाली. त्यामुळे प्रभाग क्रमांक २८ मध्ये निवडणूक प्रचाराला अधिक वेग मिळाल्याचे चित्र स्पष्टपणे दिसून येत आहे.

> प्रत्येक नागरिकाची समस्या माझ्यासाठी महत्त्वाची आहे. मी सतत उपलब्ध राहून प्रभागातील विकासकामांसाठी पाठपुरावा करत राहीन आणि नागरिकांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवून आणण्याचा पूर्ण प्रयत्न करीन.
> **–अनिता काटे,** उमेदवार, भाजपा. प्रभाग-28.



www.rklgis.org

RKL GALAXY International School
CBSE Affiliated School | Jain Minority Institution

RKL Galaxy International School

EMPOWERING YOUNG MINDS THROUGH LEARNING

# ADMISSION OPEN FOR THE YEAR 2026-27

NURSERY - STD X

What we Offer?

- CBSE Curriculum
- Separate Sports Teachers for Indoor & Outdoor Sports
- Digital Classrooms with AV Facilities
- Skill Development Programs: Robotics, Dance, Music, Speech & Drama, Entrepreneurship
- Focus on Holistic Development

Enroll Now!



Admission open for 2026-27 | Book Your Spot Today!

8698360005 | 9637339988 | Opp. to Alankapuram Society, Wadmukhwadi, Alandi Road, Pune